क्रं.अका/सापु/कावि/ २७५/२०१०
जिल्हाधिकारी भंडारा यांचे कार्यालय
दिनांक :- १ जुलै २०१०

**महाराष्ट्र शासन**
**अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
साखर वाहतुक निवीदेबाबत मुदतवाढ सुचना

**शासन निर्णय क्रमांक साखर २५१०/प्रक्र७३/नापु १९ दिनांक २ जुन २०१० अन्वये महाराष्ट्राचे** राज्यपाल यांचे करिता व त्यांच्या वतीने अतिरीक्त जिल्हाधिकारी भंडारा यांचेकडून सन २०१० ते २०१३ या कालावधीकरीता भंडारा जिल्हयाकरीता सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील साखर वाहतुकीचे कंत्राट (नियंत्रीत व दारीद्रयरेषेवरील) निश्चित करण्याकरीता वाहतुक कंत्राटदाराची नेमणूक करण्यासाठी द्धिलिफाफा पध्दतीने जाहीर खुल्या निविदा **दिनांक** ३०/०६/२०१० पर्यंत दुपारी २.०० वाजेपर्यंत मागविण्यांत आलेल्या होत्या.याबाबतची जाहीरात दिनांक १६/०६/२०१० रोजी दैनिक ग्रामीण समाचार भंडारा तसेच दिनांक २२/०६/२०१० रोजी भंडारा लोकरंग सप्ताहिक मध्ये पान क्रं.७ वर प्रसिध्दी करण्यांत आलेली होती. परंतु दिनांक ३०/०६/२०१० पर्यंत ३ पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यामुळे सदर निविदेस दिनांक १५.०७.२०१० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. दिनांक १५.०७.२०१० रोजी दुपारी २.०० वाजे पर्यंत निविदा स्विकारण्यात येतील व प्राप्त निविदा त्याच दिवशी दुपारी ४.०० वाजता अप्पर जिल्हाधिकारी भंडारा यांचे कक्षात उघडण्यांत येतील.

**निविदेच्या सर्व अटी व शर्ती वरील प्रमाणे वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या जाहिराती नुसारच राहतील.**

**निवीदा फार्म व निवीदेच्या सविस्तर अटी व शर्ती दिनांक १४.०७.२०१०** पर्यंत कार्यालयीन कामाकाजाचे वेळेस (सुटीचे दिवस वगळुन) जिल्हा पुरवठा अधिकारी, भंडारा यांचे कार्यालयात उपलब्ध राहतील. निविदे संदर्भात काही अडचनी अथवा शंका असल्यास अपर जिल्हाधिकारी भंडारा व जिल्हा पुरवठा अधिकारी, भंडारा यांचे कार्यालयाशी संपर्क साधता येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे वतीने व करिता.

(अशोक लटारे)
अपर जिल्हाधिकारी भंडारा.

अपर जिल्हाधिकारी
भंडारा

- 77 -C:\Documents and Settings\palkar sir\Desktop\NIVIDA.doc